# शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** ऑनलाईन परीक्षा कशाप्रकारे घ्याव्यात, या विषयी माहिती देण्यासाठी शिवाजी विद्यापीठात गुरुवारी (ता. १७) राष्ट्रीय उच्चस्तर अभियानांतर्गत ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली. यात परीक्षा कशी घ्यायची, बहुपर्यायी प्रश्नपत्रिका कशा पद्धतीने बनवायची, ऑनलाईन परीक्षेसाठी कोणती तयारी करायची याची माहिती दिली. कार्यशाळेला कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, परीक्षा नियंत्रक गजानन पळसे यांच्यासह अधिष्ठाता, प्राध्यापक उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात ओझोन दिन साजरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीट पर्यावरणशास्त्र विभागात जागतिक ओझोन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरणशास्त्र विभागात इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग रेफ्रिजरेशन व एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स कोल्हापूर व सांगली विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन माध्यमातून प्रबोधनपर कार्यक्रम झाला. रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेलचे जनरल मनेजर अतुल चौथाई यांनी ओझोन थर वाचविण्यासाठी जागतिक स्तरावरील करारांची भूमिका, रेफ्रिजरेशनमधील बदल माहिती दिली.

पर्यावरणशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. आरती परीट यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रेरणा घेवारी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठात हिंदी दिन साजरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ हिंदी अधिविभाग व जायंटस ग्रुप ऑफ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी भाषा दिन साजरा करण्यात आला.

हिंदी अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी हिंदी भाषेचे वैश्विक महत्त्व नमूद केले. प्रदीप घाटगे यांनी प्रास्ताविक केले. डॉ.महादेव शिंदे यांनी जायंटस ग्रुपच्या कार्याबद्दल माहिती दिली. डॉ. बसगोंडा पाटील, अक्षय भोसले यांनी भाषा सॉफ्टवेअरमधील हिंदीचा गौरव करीत जनजागृतीची अपेक्षा व्यक्त केली.